# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील दुष्काळी भागात रोजगार व पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१) ४२२३६ (३०-०४-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील दुष्काळी भागातील पाणी टंचाई मुळे पाणी, रोजगाराअभावी गावातील लोकांनी स्थलांतर करण्यास सुरु केली असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रश्नाबाबत शासनाने दखल घेऊन मंगळवेढातील दुष्काळी भागात रोजगार व पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०६-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

मंगळवेढा तालुक्यात रोजगार उपलब्धतेसाठी मग्रारोहयोअंतर्गत कामे तसेच आवश्यक उपाययोजना हाती घेण्यात आल्या होत्या. तसेच सोलापूर जिल्हयात मे २०१६ अखेर ३२ टँकर्सद्वारे ३२ गावांना व ३२ वाड्यांना आवश्यक तेथे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात आल्याने लोकांनी स्थलांतर केल्याची परिस्थिती निदर्शनास आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुरुंदवाड (जि.कोल्हापूर) येथील जिल्हा परिषदेच्या दवाखान्यातील शौचालयांची झालेली दूरवस्धा**

**(२) ४३१३६ (१७-०५-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वच्छ भारत अभियान योजनेअंतर्गत कुरुंदवाड (शहर हगणदारी मुक्त करण्यासाठी नगरपालिका माध्यमातून)येथे जिल्हा परिषदेने प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये ८ शौचालये बांधली असली तरी शौचालयाची दुरावस्था झाली असून आरोग्य केंद्रातील एकही शौचालय सुस्थितीत नसल्याने रुग्णांची मोठया प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य केंद्रातील ८ शौचालये मोडकळीस आली असून सद्यःस्थितीत ती बंद आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, असल्यास, त्यात का आढळून आले आहेत, तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात येत आलीवा आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०७-०६-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही, कुरुंदवाड येथे प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत नसून जिल्हा परिषद दवाखाना कार्यरत आहे. सदर जिल्हा परिषद दवाखान्याच्या आवारात स्वच्छ भारत अभियान योजनेंतर्गत ०३ शौचालये बांधण्यात आली होती व राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियांनातर्गत निधीतून सन २०११ मध्ये ०१ याप्रमाणे ०४ शौचालये बांधण्यात आली असून त्यापैकी ०३ सुस्थितीत असून व रुग्णांच्या वापरात आहेत व ०१ शौचालय बंद आहे.

यासंदर्भात उपअभियंता, बांधकाम विभाग, पंचायत समिती शिरोळ यांच्याकडून सदर नादुरुस्ती शौचालयाची पाहणी करुन नादुरुस्त शौचालय निर्लेखन करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी करण्याबाबत**

**(३) ५३८६७ (१५-०५-२०१७). श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्रीमती**

**दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात इतर राज्यांच्या तुलनेत सर्वाधिक शेतकऱ्यांच्या आत्महत्या घडत असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार राज्यातील शेतकऱ्यांचे आत्महत्येचे प्रमाण कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०७-२०१८) :** (१) अंशतः खरे आहे.

(२) व (३) होय.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी उस्मानाबाद व यवतमाळ या दोन जिल्ह्यांमध्ये पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येत असून त्याअंतर्गत बळीराजा चेतना अभियान राबविण्यात येत आहे. तसेच शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यासाठी “छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७” राबविण्यात येत आहे. शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध विभागांमार्फत योजना राबविण्याबाबत दिनांक २४ जुलै, २०१५ च्या शासन निर्णयान्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हयात राबविण्यात येणा-या पथदर्शी प्रकल्पांतर्गत तणावग्रस्त शेतकऱ्यांना तणावमुक्त करण्याबाबत

**(४) ५४३८९ (१५-०५-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हयात राबविण्यात येणा-या पथदर्शी प्रकल्पांतर्गत सर्वेक्षणाचे काम माहे डिसेंबर, २०१५ अखेर पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्वेक्षणामध्ये बुलढाणा जिल्हयातील २५ हजार शेतकरी तणावग्रस्त असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्वेक्षणात निदर्शनास आलेल्या तणावग्रस्त शेतक-यांना तणावमुक्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०७-२०१८) :** (१) बुलढाणा जिल्हा पथदर्शी प्रकल्पात समाविष्ट नाही.
(२) बुलढाणा जिल्हयात शासनाचे विविध योजनांचा लाभ अडचणीत असलेल्या शेतकरी कुटुंबांना देण्याचे उद्देशाने शेतकरी सर्व्हेक्षण २०१५ मध्ये करण्यात आले. बुलढाणा जिल्हयात केलेल्या सर्व्हेक्षणानुसार एकूण १९,८०० शेतकरी अडचणीत/ तणावग्रस्त असल्याचे आढळून आले आहे.
(३) बुलढाणा जिल्हा पथदर्शी प्रकल्पात समाविष्ट नाही. परंतु जिल्हाधिकारी यांच्या पुढाकाराने व मार्गदर्शनात जिल्हयातील तणावग्रस्त शेतकरी यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ प्राथम्याने देण्याच्या हेतूने शेतकरी सर्व्हेक्षण करण्यात आले आहे. त्यानुसार अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांची यादी विविध शासकीय विभागांना पुरवून दि.२४ जुलै, २०१५ च्या शासन निर्णयातील सूचनांनुसार पात्र शेतकरी कुटुंबांना विविध योजनेचा प्राधान्याने लाभ देणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालेगाव तालुक्यात (जि.नाशिक) पिण्याच्या पाण्यासह चाऱ्याची व्यवस्था करण्याबाबत**

**(५) ६०६५२ (१६-०५-२०१७). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगाव तालुक्यात (जि.नाशिक) भीषण दुष्काळी परिस्थिती असून पिण्याच्या पाण्यासह चाऱ्याचा प्रश्न गंभीर असताना शासकीय पातळीवर कोणत्याही उपाययोजना होत नसताना अशा परिस्थितीत सामाजिक संस्थांनी ठिकठिकाणी चारा छावण्या सुरु केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू चारा छावण्या महसूल विभागाने बेकायदा असल्याचे सांगितले असल्याचे माहे जून २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू छावण्यांमुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असताना शासनाच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू चारा छावण्या कायदेशीर देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०७-२०१८) :** (१) सन २०१६ मालेगाव तालुक्यात १९ गावे व ५३ वाड्यांना ३० टँकरने ८० फे-यादवारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात आला होता. चारा टंचाई नसल्याने चारा छावणी सुरू करण्यात आलेली नव्हती. तसेच सामाजिक संस्थामार्फतही मालेगाव तालुक्यात चारा छावण्या सुरू करण्यात आल्या नाहीत.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील जिल्हापरिषद सदस्यांनी केलेला गैरकारभार

**(६) ६६५०० (१६-१२-१६). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोले तालुक्यातील (जि.अहमदनगर) पंचायत समिती कार्यालयाच्या आवारात जिल्हापरिषदेच्या सेस फंडातील लोकोपयोगी साहित्यावर जिल्हापरिषद सदस्यांनी दिनांक १६ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास रॉकेल ओतल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास,तद्नुसार शासकीय सेस फंडातील लोकोपयोगी साहित्यावर रॉकेल ओतणाऱ्या जिल्हापरिषद सदस्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१८) :** (१) होय.

(२) होय, गट विकास अधिकारी,पंचायत समिती,अकोले यांच्या अहवालातून जिल्हा परिषद सदस्यांनी दिनांक १६ ऑगस्ट,२०१६ रोजी वा त्यासुमारास रॉकेल ओतल्याची घटना घडली असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) गट विकास अधिकारी,पंचायत समिती,अकोले यांनी पोलिस ठाणे अमलदार अकोले पोलिस स्टेशन,जि. अहमदनगर येथे अदखलपात्र गुन्हा दि. ६/३/२०१७ रोजी दाखल केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राजापूर (जि.रत्नागिरी) पंचायत समितीमार्फत अपंग साहित्य वाटपात व अन्य योजनेतंर्गत साहित्य वाटपात झालेला गैरव्यवहार

**(७) ७१८११ (२७-०१-२०१७). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) पंचायत समितीमार्फत सन २०१५-१६ मध्ये अपंग साहित्य वाटपात तसेच अन्य योजनेतंर्गत साहित्य वाटपात झालेल्या कोटयवधी रूपयांच्या गैरव्यवहाराबाबत चौकशी होऊन संबंधित दोषींवर विनाविलंब कारवाई होण्याबाबतच्या मागणीचे निवेदन श्री.विलास भीकू कोलते, अध्यक्ष ग्रामविकास कमिटी यांनी मा.ग्रामविकास मंत्री विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.रत्नागिरी, जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१८) :** (१) होय.

श्री. विलास भिकू कोलते यांचे निवेदन दि.४ नोव्हेंबर,२०१६ रोजी जिल्हा परिषदेकडे प्राप्त झाले आहे.

(२) तालुकास्तर चौकशी समितीमार्फत चौकशी करणेत आली असून एकूण २५ लाभार्थ्यांपैकी नियुक्त केलेल्या चौकशी समितीमार्फत २३ लाभार्थी यांची समक्ष भेट घेऊन त्यांना घरघंटी पोहच झाल्याबाबत खात्री करण्यात आली असून तशा पोहोच घेण्यात आलेल्या आहेत. उर्वरीत दोन लाभार्थी श्री.उमेश पराडकर यांचे गावातील असल्याने त्यांचे जवळचे नातेवाईकांचे हस्ते संबंधित लाभार्थ्यांच्या घरघंटया पाठविल्या असता संबंधित लाभार्थ्यांने घरघंटया स्विकारण्यास नकार दिल्याने अंगणात/पडवीत घरघंटया संबंधिताकडून ठेवण्यात आल्या होत्या.

तथापि, दि. २३/१/२०१७ रोजी गट विकास अधिकारी,सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, अध्यक्ष तंटामुक्ती समिती, सामाजिक कार्यकर्ते यांच्या समक्ष सदर लाभार्थ्यांनी घरघंट्या स्विकारल्या

(३) सदर प्रकरणी श्री. एस.एम. कोरे,कनि.सहाय्यक यांची एक वेतनवाढ रोखण्यात आली असून श्री. डी.पी.नाटेकर,विस्तार अधिकारी यांचेवर ठपका ठेवणे ही शिक्षा करणेत आली आहे. तसेच विविध योजनांमधील साहित्य वितरणामध्ये यापुढे अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत सक्त सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कृष्णा मराठवाडा उपसासिंचन योजनेसाठी मुळशी विद्युत प्रकल्पातील अतिरिक्त पाणी आरक्षित करण्याबाबत

**(८) ७२१९९ (२७-०१-२०१७). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुळशी नदीवर बांधण्यात आलेल्या मुळशी प्रकल्पाचा मुख्यत्वे विद्युत निर्मितीसाठी उपयोग करण्यात येत असून याठिकाणी जवळपास ३०० मेगावॅट विद्युत निर्मिती होत आहे, यात एकूण १५० मेगावॅट विद्युतनिर्मिती ही पाण्याच्या प्रवाहाचा उपयोग करुन केली जाते व भविष्यात विजेचा तुटवडा निर्माण झाल्यास ऐनवेळी १५० मेगावॅट अतिरिक्त विजनिर्मिती करण्यासाठी सुमारे २० टी.एम.सी. पाणी उंचावर साठवले जाते परंतु बहुतांश वेळा सदर पाण्याचा उपयोग करण्याची गरज पडलेली नाही यामुळे सदरचे पाणी अतिरिक्त राहते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृष्णा मराठवाडा उपसासिंचन योजनेसाठी मुळशी विद्युत प्रकल्पातील अतिरिक्त पाणी आरक्षित करण्याबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ४ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे विनंती केलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१९-०६-२०१८) :** (१) नाही.

(२) होय.

(३) टाटा जलविद्युत प्रकल्पांसाठी प्रति वर्षी ५४.५० टीएमसी तर सलग ५ वर्षात जास्तीत जास्त २१३ टीएमसी पाणी विद्युत निर्मितीसाठी वापरण्यास प्रथम कृष्णा पाणी तंटा लवादानुसार अनुमती आहे.

त्यानुसार टाटा कंपनीतर्फे प्रती वर्षी वीज निर्मितीचे नियोजन केले जाते. टाटा पॉवर कंपनीने या धरणाच्या अनुषंगाने सन १९२१ ते १९३६ मध्ये तत्कालीन सरकार बरोबर कायम स्वरुपी करारनामे केलेले आहेत. वीजेच्या तुटवड्याच्या परिस्थितीत विद्युत निर्मिती करता येण्यासाठी पाणीसाठा राखीव ठेवण्याची कोणतीही तरतूद करारनाम्यात नाही. मुळशी प्रकल्पाचा मागील ५ वर्षाचा विद्युत निर्मितीसाठीचा पाणी वापर व ३० जून रोजीचा शिल्लक साठा पाहता, अतिरिक्त पाणी शिल्लक राहत नसल्याचे दिसते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ढोराळे (ता. बार्शी, जि.सोलापूर) येथील शेतकऱ्याची केलेली आत्महत्या

**(९) ७३९७१ (१३-०४-२०१७). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ढोराळे (ता. बार्शी, जि.सोलापूर) येथील शंकर सदाशिव धायगुडे (वय ४५ वर्षे) यांनी शेती नापिकी झाल्यामुळे व आयसीआयसीआय बँकेचे कर्ज फेडण्यास असमर्थ झाल्यामुळे कर्जाला कंटाळून राहत्या घरामध्ये दिनांक ५ जानेवारी, २०१७ वा त्यासुमारास गळफास लावून आत्महत्या केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती उक्त शेतकऱ्याच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

मौजे ढोराळे, ता.बार्शी, जि.सोलापूर येथील शंकर संदीपन धायगुडे वय ४० वर्षे यांनी दि.०६/०१/२०१७ रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याचे आढळून आहे.

(२) होय.

(३) जिल्हास्तरीय समितीच्या दि.०६/०२/२०१७ रोजीच्या सभेमध्ये सदर प्रकरण तालुकास्तरीय समितीच्या अहवालानुसार अपात्र ठरविण्यात आले असल्याने मदत देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जुन्नर (जि.पुणे) तालुक्याला पर्यटन क्षेत्राचा दर्जा देण्याबाबत

**(१०) ७५३८६ (१४-०४-२०१७). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील किल्ले शिवनेरी ही शिवरायांची जन्मभूमी पर्यटन, कृषी,पौराणिक लेणी, ७ गडकोट किल्ले, तिर्थक्षेत्र, पुरातन मंदिरे, जगातील प्रथम क्रमाकांची रेडिओ टेलीस्कोपी दुर्बिण, दाऱ्या घाट, नाणे घाट, माळशेज घाट त्याचप्रमाणे अष्टविनायकांपैकी ओझर व लेण्याद्री तिर्थक्षेत्र आदी विविध प्रकारच्या पर्यटन विषयक बाबी असल्याने पर्यटन विभागांकडून एमटीडीसीच्या माध्यमातून जुन्नर तालुक्याच्या विकास कामांच्या सर्वेसाठी विशेष तज्ज्ञाची नेमणूक करून जुन्नर तालुक्याचा पर्यटन तालुका म्हणून समावेश करावा अशा मागणीचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २३ फेब्रुवारी व १३ मे, २०१६ रोजी मा.मुख्यमंत्री, मा.पालकमंत्री, पुणे जिल्हा, जिल्हाधिकारी, पुणे व तद्ननंतर पुन्हा दिनांक २६ जुलै, २०१६ रोजी मा.पर्यटनमंत्री यांचेकडे सविस्तर निवेदन सादर करून मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जुन्नर तालुक्याचा महाराष्ट्र राज्याच्या पर्यटनात अग्रक्रमाने समाविष्ट करून पर्यटन क्षेत्राचा दर्जा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२९-०६-२०१८) :** (१) होय

(२) पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुका विशेष पर्यटन क्षेत्र घोषित करण्याबाबतचा शासन निर्णय दि.२१/३/२०१८ रोजी निर्गमित केलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हा परिषद व पंचायत समितीने मागासवर्गीयांसाठी असलेल्या अनेक योजनांमध्ये केलेला गैरव्यवहार

**(११) ७७९४५ (१९-०४-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा परिषद व पंचायत समितीने मागासवर्गीयांसाठी असलेल्या अनेक योजनांचे लाभ बनावट कागदपत्रांच्या आधारे अमागासवर्गीयांसह धनिकांनाही दिले असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास,त्या नुसार बनावट कागदपत्रांच्या आधारे योजनांचा गैरवापर करणाऱ्या संबंधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१८) :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) तालुक्यातील हिटणी, खणदाळ, नांगनूर, अरळगुंडी, कडलगे, इदरगुच्ची या गावाचा चित्री लाभक्षेत्रात समावेश करण्याबाबत**

**(१२) ७८६८६ (१७-०४-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडहिंग्लज तालुक्यातील (जि.कोल्हापूर) खणदाळ बंधाऱ्याच्या खालील हिटणी, खणदाळ, नांगनूर, अरळगुंडी,कडलगे,इदरगुच्ची या गावाचा चित्री लाभक्षेत्रात समावेश करुन बारमाही पाणी देण्याची मागणी प्रांताधिकारी यांना गडहिंग्लज येथील शेतकऱ्यांनी माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२०-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) गडहिंग्लज तालुक्यातील (जि.कोल्हापूर) खणदाळ बंधाऱ्यांच्या खालील हिटणी, खणदाळ, नांगपूर, अरळगुंडी, कडलगे, इदरगुच्ची या गावांना कायम स्वरुपी पाणी मिळण्यासाठी चित्री धरणातील पाणीसाठा वाढविणेच्या दृष्टीने धरणाची उंची वाढवावी अशी विनंती शेतकऱ्यांनी निवेदनाद्‌वारे केली आहे.
मागणीच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर अभ्यास करण्यात आला असून, चित्री प्रकल्पस्थळी उपलब्ध जलनिष्पत्तीचा विचार करता, तसेच कृष्णा तंटा लवादाच्या अनुषंगाने चित्री धरणाची उंची वाढविणे शक्य नसल्याबाबत निदर्शनास आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जव्हार-खोपोली या राज्य महामार्गाची अंबरनाथ येथील कामे पूर्ण करण्याबाबत**

**(१३) ८१३५९ (२१-०४-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील जव्हार- खोपोली या राज्यमार्गाचे काम पूर्ण न झाल्यामुळे सदर शहरातील मार्गावर वारंवार अपघात होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर राज्यमहामार्गाचे काम तातडीने पूर्ण केले नाही तर आंदोलन करण्याचा निर्णय तेथील नागरीकांनी घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त महामार्गाचे काम तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१८) :** (१), (२), (३) व (४) जव्हार-खोपोली राज्यमार्गाच्या कामास दिनांक १६ मार्च, २०१७ रोजी प्रशासकिय मान्यता दिली असून अतिक्रमण निष्कासित केलेल्या जागेत रस्ता रुंदीकरण करण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, कामाचे पर्यवेक्षण करणे इत्यादी कामासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्याबाबत दोनदा निविदा मागविण्यात आल्या होत्या. तसेच दिनांक ०१.०१.२०१८ रोजी सल्लागाराची नेमणूक करण्यात आली असून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

---

## कोल्हापूर जिल्हयात लॅपटॉप व एलसीडीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(१४) ८७१९२ (२१-०८-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयातील सर्वपक्षीय कृती समितीने लॅपटॉप व एलसीडीमध्ये गैरव्यवहार झाल्याप्रकरणी युनिटी कन्सलंटटचे व्यवस्थापक यांना दिनांक २५ मे,२०१७ रोजी वा त्यासुमारास घेराव घातला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार गैरव्यवहार करण्याऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१८) :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राधानगरी, गडहिंग्लज व आजरा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील बऱ्याच गावात पाण्याची टंचाई असल्याबाबत

**(१५) ८७४७३ (१९-०८-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यात राधानगरी, गडहिंग्लज व आजरा तालुक्यातील बरीच गावे टंचाईग्रस्त असून पिण्यासाठी व शेतीसाठी पाणीसाठा पुरेश्या प्रमाणात नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या धरणात किती पाणीसाठा आहे व त्याचे नियोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१९-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

राधानगरी १०, गडहिंग्लज ५ व आजरा २३ या तिन्ही तालुक्यातील एकुण ३८ गावांमध्ये सन २०१६-१७ मध्ये संभाव्य टंचाई घोषीत करण्यात आलेली होती. सदर संभाव्य टंचाईग्रस्त गावांमध्ये राधानगरी तालुक्यातील ९ व आजऱ्यामध्ये २ अशा एकुण ११ नवीन विंधन विहीरीचे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मंजूर करण्यात आले होते. सदरचे प्रस्ताव ग्रामीण पाणी पूरवठा विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडून पुर्ण करण्यात आले. तसेच गडहिंग्लज तालुक्यामध्ये तालुकास्तरावर ०१ खाजगी विहीर अधिग्रहीत करण्यात आली होती.

(२) या तीनही तालुक्यातील मोठया, मध्यम व ल.पा.प्रकल्पामध्ये एकूण १०४९.८४ दलघमी (७६ टक्के) इतका पाणीसाठा आहे.

कालवा सल्लागार बैठकीत झालेल्या निर्णयाचे अनुषंगाने पाणीवापराचे नियोजन करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे निंबर्गी (ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर) येथील पाझर तलावास पाईपलाईनव्दारे पाणी सोडण्याबाबत**

**(१६) ९०१३९ (१८-०८-२०१७). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे निंबर्गी (ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर) येथील पाझर तलावास पाईपलाईनव्दारे पाणी सोडण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा. जलसंपदा मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१९-०६-२०१८) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रामीण विकासासाठी अन्य योजना रोजगार हमी योजनेमध्ये समाविष्ट करण्याबाबत**

**(१७) ९३५७६ (१९-०८-२०१७). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा विभागात रोजगार हमी योजनेच्या मजूर संख्येत माहे एप्रिल व मे २०१७ या दोन महिन्यांत सुमारे १ लाखाने वाढ झाल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रोजगार हमी योजनेमध्ये रस्ते व इतर सार्वजनिक कामांबरोबरच शोषखड्डे, शेततळे, शौचालये, गांडूळ कंपोस्ट खत यासारख्या वैयक्तिक लाभाच्या योजनांना प्राधान्य दिल्यामुळे मजूर संख्येत लक्षणीय वाढ झाली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वैयक्तिक लाभावरील योजना व ग्रामीण विकासासाठी अन्य योजना रोहयोमध्ये समाविष्ट करुन मॉडेल स्वरुपात राज्यभर राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१३-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३) राज्यात समृद्ध महाराष्ट्र जनकल्याण योजनेतंर्गत सार्वजनिक व वैयक्तिक स्वरुपांच्या कामांचा लाभार्थ्यांना जास्तीत जास्त लाभ देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्हयात वैजापूर पंचायत समितीच्या सभागृहात विद्युतपंपाचे संच व साहित्य वाटपाविना पडून असल्याबाबत

**(१८) ९३६०२ (१९-०८-२०१७). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्हयात वैजापूर पंचायत समितीच्या सभागृहात जिल्हा परिषद उपकरातून शेतकऱ्यांसाठी वाटप करावयाचे १७ लाख रुपयांचे सुमारे ५९ विद्युतपंपाचे संच व साहित्य वाटपाविना पडून असल्याची बाब दिनांक २४ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लाभार्थींची निवडच करण्यात आली नसल्याने हे संच वाटपाविना पडून असल्याचे व त्याबाबत जि.प.उपाध्यक्ष तथा कृषी सभापतीच अनभिज्ञ असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धरणाच्या लाभक्षेत्राची जमीन पाण्यामध्ये बाधित झाल्याने पिकाचे झालेले नुकसान**

**(१९) ९८६४८ (२९-१२-२०१७). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **लाभक्षेत्र विकास विभाग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शे.मैनु शे.दादु गट नं १९५ रा.इसराळ (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील नामदेव अश्रू नरवाडे गट नं २०१७ (ता.चिखली, जि.बुलढाणा) यांची १० ते १२ वर्षापासून धरणाच्या लाभ क्षेत्राची जमीन पाण्यामध्ये बाधित झाल्यामुळे त्यांच्या पिकाचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, यानुसार उक्त शेतक-यांना तात्काळ नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

खडकपुर्णा धरणामध्ये सन २०१३ मध्ये पुर्ण क्षमतेने पाणीसाठा निर्माण झाल्यावर मौ. इसरुळ, ता.चिखली जि.बुलढाणा येथील गट १९५, गट २१७ व गट १०६ चे क्षेत्र अतिरिक्त बाधित झाल्याचे निदर्शनास आल्यावर सदर ०.९४ हे. आर. क्षेत्राचा भुसंपादन प्रस्तावाकरिता सरळ खरेदी प्रस्ताव दि.१७.१.२०१७ रोजी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत मंजूर झाला आहे. सरळ खरेदी मंजूर प्रस्तावातील ३ कास्तकारापैकी २ कास्तकार श्यामसुंदर भुतेकर गट क्र. १०६ क्षेत्र ०.४० हे. आर व शेख मैनु शेख दादु यांची गट क्र. १९५ मधील संपादित ०.२८ हे. आर. क्षेत्राची सरळ खरेदी झालेली असून संबंधितांना मोबदला देण्यात आलेला आहे. व श्री. नामदेव आश्रु नरवाडे गट क्र. २१७ यांचे ०.२६ हे. आर. क्षेत्राचा मंजुर निवाडयात समावेश असुन रु. ८.२६ लक्ष मोबदल्याचा निधी उपलब्ध आहे. परंतु सदर शेतकरी श्री. नरवाडे खरेदीस हजर रहात नसल्याने त्यांचा मोबदला देणे बाकी आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हा परिषदेच्या विविध विभागातील निधी अखर्चित राहिल्याबाबत**

**(२०) ९९०८९ (०३-०१-२०१८). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागील चार वर्षात पुणे जिल्हा परिषदेच्या विविध विभागातील मिळुन ४५ कोटी रूपयांचा निधी खर्चा विना पडून असल्याची माहिती स्थायी समितीच्या बैठकीत दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१२ ते २०१६ दरम्यान शासन निधीतील खर्चीत रकमेची माहिती प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी पुणे जिल्हा परिषदेला मागीतली होती जिल्हा परिषदेने

विविध विषयांसाठी मंजूर केलेल्या रकमा या दोन वर्षापर्यंत वापरता येतात त्यानंतर तो निधी परत जातो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय,
(३) पुणे जिल्हा परिषदेचा सन २०११-१२ ते २०१५-१६ मध्ये ४०.४४ कोटी इतका निधी अखर्चित होता. त्यापैकी १७.०५ कोटी इतका निधी २१ सप्टेंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये बांधकामविषयक योजनांवर खर्च करण्यात आला आहे. दि.६ जून, २००८ रोजीच्या शासन निर्णयान्वये अखर्चित निधी लगतच्या पुढील आर्थिक वर्षाअखेर खर्च करण्यास परवानगी आहे. शासन परिपत्रक दि. २८ जून, २०१७ व दि.१६ सप्टेंबर, २०१७ च्या अर्धशासकीय पत्रान्वये सर्व अखर्चित रक्कमांची माहिती संकलित करण्याची व शिल्लक अखर्चित निधी शासनखाती भरण्याबाबत जिल्हा परिषदेकडून कार्यवाही करण्यात आलेली आहे.
दि. २१ सप्टेंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये १८.८० कोटी रकमेस ३१/१२/२०१७ पर्यत खर्च करणेस मान्यता आहे. ती रक्कम वगळून उर्वरित निधी हा शासन खाती भरणा करण्यात आला आहे.मान्यता असलेल्या रक्कमेपैकी अखर्चित निधी १.६३ कोटी हा लेखे अंतिम झाल्यानंतर शासन खाती भरणा करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**१४ वा वित्त आयोगाचा १०० टक्के निधी थेट ग्रामपंचायतीकडे सुपूर्द करण्याच्या निर्णयाबाबत**

**(२१) ९९३५९ (२२-१२-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) १४ वा वित्त आयोगाचा १०० टक्के निधी थेट ग्रामपंचायतीकडे सुपूर्द करण्याचा शासनाने निर्णय घेतला असून त्यातील १० टक्के निधी लेखा परिक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतरच परफॉर्म्सन्स ग्रॅन्ट म्हणूनच देय असेल असा शासन निर्णय जाहिर झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाशिम जिल्हयातील बहुतांश ग्रामपंचायतींनी लेखा परिक्षण प्रक्रिया करावी यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१८) :** (१) होय.
(२) सन २०१५-१६ ह्या वर्षाचे वाशिम जिल्हयातील बहुतांश ग्रामपंचायतीचे लेखापरिक्षण पूर्ण झालेले असून सन २०१६-१७ चे लेखापरिक्षणाचे काम पूर्ण करण्याचे दृष्टीने उप मुख्य

कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जिल्हा परिषद, वाशिम यांनी सर्व ग्राम विकास अधिकारी यांना सूचना दिल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगाव (जि.वाशिम) तालुक्यात मंजूर विहीरींची कामे पूर्ण करण्याबाबत**

**(२२) ९९४१९ (२६-१२-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगाव (जि.वाशिम) तालुक्यात ८६४ सिंचन विहीरींचे काम ३० जूनपर्यत पूर्ण करण्याचे उदिष्ट असताना पालकमंत्री सहस्त्र सिंचन विहीरीपैकीय तब्बल ४६५ विहीरींच्या कामांना सुरुवातही झाली नसल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्वरित २९९ विहीरींचे काम ३० जून पर्यत कसे पूर्ण होणार नसल्याने ही योजना तालुक्यात अयशस्वी झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर मंजूर विहीरींचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (३०-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.
मालेगाव (जि.वाशिम) तालुक्यात ५६५ विहीरींच्या कामांना सुरुवात करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) २९९ सिंचन विहीरींना तात्काळ कार्यारंभ आदेश व प्रशासकीय मंजूरात देण्याची कार्यवाही गटविकास अधिकारी, मालेगाव यांचेस्तरावरुन सुरु असून ती जून, २०१८ पर्यंत पूर्ण करण्यात येतील.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हा परिषदेला जिल्हा नियोजन मंडळाकडून मागील दोन वर्षात देण्यात आलेल्या निधीच्या खर्चाचा तपशील न दिल्याबाबत**

**(२३) १००८२४ (०४-०१-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हा परिषदेला जिल्हा नियोजन मंडळाकडून मागील दोन वर्षात देण्यात आलेल्या निधीच्या खर्चाचा तपशील न दिल्याने पुढील निधी न देण्याचा निर्णय माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेने खर्चाचा तपशील अद्यापपर्यंत न देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१८) :** (१) नाही.
(२) खर्चाचा तपशील जिल्हा नियोजन मंडळाकडे सादर करणेत आलेला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भातकुली (जि.अमरावती) तालुक्यातील निम्न पेढी प्रकल्प केंद्र सरकारच्या निधी अंतर्गत पूर्ण करण्याबाबत**

**(२४) १०१८३५ (२६-१२-२०१७). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भातकुली (जि.अमरावती) तालुक्यातील निम्न पेढी प्रकल्प पूर्ण केंद्र सरकारच्या निधी अंतर्गत पूर्ण होईल या संदर्भात मा.केंद्रीय जल संपदा मंत्री यांनी नुकतीच संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन घोषणा केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निम्न पेढी प्रकल्प पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१९-०६-२०१८) :** (१) व (२) होय, याबाबत मा. केंद्रीय जलसंपदा मंत्री यांचे अध्यक्षतेखाली नवी दिल्ली येथे दिनांक २५/१०/२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे निम्न पेढी प्रकल्प डिसेंबर,२०१९ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन असून त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आस्तान (ता.खेड, जि.रत्नागिरी) ग्रामपंचायत हद्दीतील विकासकामे न करता शासकीय निधीचा गैरवापर केल्याबाबत**

**(२५) १०३१०१ (०६-०१-२०१८). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आस्तान (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील ग्रामपंचायत येथील ग्रामपंचायतीच्या विकास कामाच्या निधीमध्ये (जलकुंभ, घरकुल, शौचालय व पाखाडी बांधकाम व दुरुस्त करणे)

अपहार झाल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) १९६४ चे ३ अन्वये कार्यवाही करणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार ग्रामपंचायतीच्या विकास कामाच्या निधीमध्ये गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) होय. संबधित ग्रामसेवकाची एक वेतनवाढ थांबविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे जिल्हयातील खडकवासला धरणातील मुठा कालव्यातून शेतीसाठी सोडण्यात येत असलेले पाणी बंद करण्यात आल्याबाबत**

**(२६) १०३१४८ (०२-०१-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(३) पुणे जिल्हयातील खडकवासला धरणातून मुठा कालव्यातील शेतीसाठी सोडण्यात येत असलेले पाणी दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी पासून बंद करण्यात आली असून सध्या येथील पिके काढणीची कामे सुरु असल्याने पिकांना पाण्याची असलेली गरज लक्षात घेता येथे आणखी काही दिवस धरणातून पाणी सोडणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार मुठा कालव्यातील पाणी शेतीसाठी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०६-२०१८) :** (१) सदरील कालवा दि.२०/७/२०१७ ते दि.०२.१०.२०१७ पर्यंत चालू होता. लाभक्षेत्रामध्ये समाधानकारक पाऊस झालेला असल्यामुळे नविन मुठा उजवा कालवा दि.०२/१०/२०१७ पासून बंद करण्यात आलेला होता.

त्या नंतर रब्बी हंगामात शेतकऱ्यांकडून मागणी आल्यानंतर दि.१०/१२/२०१७ ते दि.४/१/२०१८ पर्यंत या कालावधीत कालवा सुरु करण्यात आलेला होता.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बेबंळा प्रकल्पातील कालव्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(२७) १०३३९० (०२-०१-२०१८). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाभुळगांव (जि.यवतमाळ) येथील बेबंळा प्रकल्पा अंतर्गत सावंगी, हस्तापुर या शिवारामध्ये बेबंळा प्रकल्पाच्या पाटस-याचे काम करण्यात आले असल्याचे सन २०१७ मध्ये निर्दशनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाटस-याचे निकृष्ट दर्जाचे काम केल्यामुळे त्या भागातील जमीनीमध्ये पाटस-याव्दारे पाणी सोडल्याने शेतीचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार दोषी अधिका-यावर कारवाई करण्यासह नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१९-०६-२०१८) : (**१) होय, हे खरे आहे.

सांवगी व हस्तापुर शिवारातील पाटसऱ्यांची कामे डिसेंबर २००८ मध्ये पुर्ण झालेली आहेत

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्हा परिषदेमध्ये ग्रामसेवकांच्या पदोन्नतीमध्ये झालेला गैरकारभार**

**(२८) १०३४२५ (०६-०१-२०१८). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शासनाने दिनांक २ नोव्हेंबर, २०१७ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार सर्व पदोन्नतींना स्थगित देण्यात आल्या असतानाही औरंगाबाद जिल्हा परिषदमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील पदोन्नती समितीने दिनांक १४ नोव्हेंबर,२०१७ रोजी तीन ग्रामसेवकांना विस्तार अधिकारी ही पदोन्नती दिली परंतु त्याविरुद्ध जि. प. पदाधिकारी व सदस्यांनी तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर पदोन्नतीसाठी दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजीची सेवा जेष्ठता सूचीही विचारात घेतली नाहीच पण मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या रजेवर जाण्याच्या एक दिवस आधी हा निर्णय संशयास्पद रित्या घेतला असल्याचे दिसून येत आहे अशीही तक्रार इतर ग्रामसेवकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार दोषीं अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०६-२०१८) :** (१) ग्रामसेवकांना पदोन्नती दिल्याची बाब वस्तुस्थितीस धरून आहे. मात्र याबाबत जिल्हा परिषद पदाधिकारी/सदस्य यांनी तक्रार केल्याचे आढळून आले नाही

(२) शासन परिपत्रक दिनांक ३१.०३.२०१७ नुसार सुधारीत होणा-या जेष्ठता सुचिचे अधीन राहून पदोन्नती देण्याबाबत निवड समितीने निर्णय घेतला. पदोन्नती समिती रितसर बैठक घेऊनच पदोन्नतीचा निर्णय घेण्यात आलेला आहे घाईघाईने निर्णय घेण्यात आला आहे खरे नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी हे रजेवर गेलेले नसून ते दि. २०.११.२०१७ ते ५.१२.२०१७ पर्यंत प्रशासकिय प्रशिक्षणांसाठी गेलेले होते. महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक संघ जिल्हा शाखेचे व इतर ग्राम विकास अधिकारी यांचे शासन परिपत्रक दिनांक ३१ मार्च,२०१७ नुसार कार्यवाही करणेबाबत निवेदन दिनांक १८.११.२०१७ रोजी जिल्हा परिषदेला प्राप्त झाले आहे.

(३) पदोन्नतीस "जैसे थे" स्थिती ठेवण्याचे आदेश मा. न्यायालयाने दिले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुद्रांक शुल्कापोटी शासनाकडून जिल्हापरिषदांना देय असलेल्या रक्कमेबाबत**

**(२९) १०५३२३ (२८-०३-२०१८). श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र जिल्हापरिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील कलम १५८ अन्वये पुणे जिल्हापरिषदेला सन २०१५-१६ व सन २०१६-१७ मध्ये मुद्रांक शुल्क अनुदानापोटी शासनाकडुन किती रक्कम देय होती,

(२) असल्यास, उक्त देय रक्कमेपैकी आतापर्यंत किती रक्कम जिल्हा परिषदेला अदा करण्यात आली आहे,

(३) असल्यास, सन २०१७-१८ व सन २००९-१० ते २०१४-१५ या कालावधीत मुद्रांक शुल्कापोटी शासनाकडून जिल्हा परिषदेला किती रक्कम देय आहे,

(४) असल्यास, मुद्रांक शुल्काची रक्कम जिल्हा परिषदेला देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१८) :** (१) पुणे जिल्हा परिषदेला १% मुंद्राक शुल्क अनुदानापोटी सन २०१५-१६ रू.२४७.४२ कोटी व सन २०१६-१७ रू.२१६.२२ अशी एकूण रू.४६३.६४ कोटी इतकी रक्कम देय होती.

(२) सन २०१५-१६ रू. १५९.६२ कोटी व सन २०१६-१७ रू.१८५.३५ कोटी असे एकूण रू.३४४.९७ कोटी रक्कम वितरीत करण्यात आली आहे.
(३) पुणे जिल्हा परिषदेस प्रत्यक्ष वसूलीनुसार सन २०१७-१८ यावर्षी रू.२५७.४४ कोटी देय असून त्यापैकी रू. २२५.३० कोटी वितरीत करण्यात आली असून सन २००९-१० ते सन २०१४-१५ या कालावधीसाठी रू.८४४.८० कोटी देय असून रू. ७७४.४८ कोटी वितरीत करण्यात आलेली आहे.

सन २०१७-१८ व सन २००९-१० ते सन २०१४-१५ या कालावधीत मुंद्राक शुल्कापोटी शासनाकडून रू.१०२.४६ कोटी प्रत्यक्ष वसूलीनुसार देय आहे.
(४) नोंदणी महानिरीक्षक,महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्या दि. २८/७/२०१७ च्या पत्रान्वये मुद्रांक शुल्क अनुदानाच्या रकमा राज्यातील जिल्हा परिषदांना उपलब्ध करण्यासाठी रु. ४२३.१८६६ कोटी पुरवणी मागणीचा प्रस्ताव हिवाळी अधिवेशनात वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. तसेच सन २०१७-१८ च्या सुधारीत अंदाजात सदर अनुदानाखाली वाढीव मागणी केली होती. तथापि निधी मंजूर झाला नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हा परिषदेला जिल्हा नियोजन समितीकडून मिळालेला**
**निधी अखर्चित राहिल्याबाबत**

**(३०) १०५५१६ (०६-०४-२०१८). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हा परिषदेला जिल्हा नियोजन समितीकडून मागील आर्थिक वर्षात देण्यात आलेल्या निधीपैकी सुमारे ७६ कोटींचा निधी अखर्चित असल्याने दिनांक १५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी,अहमदनगर यांनी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये विभाग प्रमुखांना निधी खर्च करण्याबाबत सूचना देवून देखील मुबदा निधी खर्च झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३)प्रत्येक वेळोवेळी मासिक सभेमध्ये तसेच लेखी व तोंडी सूचना देऊन सर्व निधी खर्च करणेबाबत सर्व खाते प्रमुखांना मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,अहमदनगर यांनी सूचना दिलेल्या आहेत.

सदर निधी खर्च करणेची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## थेट लाभ प्रणाली DBT व कॅशलेस प्रणालीच्या वापरातील अनेक अटींमुळे शेतक-यांना थेट लाभ योजना मिळण्यास होत असलेल्या अडचणीबाबत

**(३१) १०६१०८ (२८-०३-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हा परिषदेच्या कृषी विभागातील वैयक्तिक लाभ योजनेतील गैरव्यवहाराला आळा बसावा म्हणून थेट लाभ प्रणाली DBT व कॅशलेस प्रणालीच्या वापरातील अनेक अटींमुळे शेतक-यांना थेट लाभ योजना मिळण्यास अनेक अडचणी निर्माण होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्हा परिषदेच्या स्वनिधीतून कृषी व पशुसंवर्धन विभागाच्या १६ प्रकारच्या वैयक्तिक लाभ योजनेच्या DBT व कॅशलेस प्रणालीच्या सक्तीमुळे शेतक-यांनी योजनेसाठी अर्जच केले नसल्याने वैयक्तिक लाभ योजनेच्या निधीचे वाटप पूर्णपणे होऊ शकले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून उक्त विभागातील वैयक्तिक लाभ योजनेचा निधी शेतक-यांना तात्काळ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) शेतक-यांना या योजनेचा लाभ रोखीने खरेदी करण्यास त्वरीत मिळण्याकरीता विनारोख (Cash Less)ची अट शिथिल करुन अनुमती देण्यात आली आहे.

(४) प्रश्नच उदभवत नाही.

---

## बुलढाणा जिल्हयातील बोरखेडी लघुपाटबंधारे योजनेंतर्गत संपादित गावठाणांचे पुनवर्सन करताना नवीन गावठाण्यामध्ये पायाभूत सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(३२) १०६७२९ (२८-०३-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील बोरखेडी लघुपाटबंधारे योजनेअंतर्गत संपादित गावठाणांचे पुनर्वसन करताना नवीन गावठाण्यामध्ये पाणीपुरवठा, शाळा इमारत, समाजमंदिर, रस्ते, दफनभूमी, बाधीत व्यक्तीच्या शेतीकडे जाणारे मार्ग, सार्वजनिक शौचालय व उघडी गटारे इत्यादी मुलभूत सुविधांचा अभाव असल्याने पुनर्वसित नागरीकांची गैरसोय होत असल्याने याबाबत कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग बांधकाम विभाग क्र.३ या कार्यालयावर दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास आंदोलन केले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार पुनर्वसित नागरीकांना मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१३-०७-२०१८) :** (१) बुलढाणा जिल्ह्यातील बोरखेडी (मिश्र संग्राहक) लघु पाटबंधारे योजने अंतर्गत पार्डी गावाचे पुनर्वसन अद्याप झालेली नाही त्यामुळे कोणतीच सुविधा पुरविण्यात आलेली नाही. पुनर्वसनाकरीता आवश्यक जमीनीचा निवाडा झाला होता. परंतु या भूसंपादनास शेतमालकांचा तीव्र विराध असल्यामुळे मा.उच्च न्यायालयात त्यांनी रिट याचिका दाखल केली होती. दि. २ मे, २०१७ रोजी सदर याचिकेवरील निकाल देतांना मा.उच्च न्यायालयाने भु.सं.प्र.क्र.०३/०४-०५ व भु.सं.प्र.क्र. ०४/०४-०५ चा निवाडा रद्द ठरविला आहे. त्यामुळे आता पार्डी गावाचे ग्रामपंचायतचे ठरावानुसार पुनर्वसनाकरिता मौजे सुलतानापुर व मौजे पार्डी, ता.लोणार येथील स्थळ सरळ खरेदीने निश्चित करण्यात आले असुन सदर स्थळास जिल्हा पुनर्वसन समिती यांनी दि.०८/१२/२०१७ च्या सभेत मंजुरी दिली आहे. सदर जागेच्या संयुक्त मोजणीची प्रक्रिया फेब्रुवारी,२०१८ मध्ये पूर्ण झाली असून अहवाल अद्याप अप्राप्त आहे. तसेच गावठाणाचे पुनर्वसन करताना लागणाऱ्या सर्व मुलभूत सुविधांचे अंदाजपत्रक तयार करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. या कार्यालयासमोर दि.१७ जानेवारी,२०१८ अथवा त्या सुमारास कोणतेही आंदोलन करण्यात आलेले नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कुपोषित बालकांच्या कुटुंबाला रोजगार मिळण्याबाबत

**(३३) १०८६०१ (०७-०४-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिवसेंदिवस कुपोषित बालकांचा प्रश्न गंभीर होत असल्याने कुपोषित बालकांच्या कुटुंबास रोजगार हमीची कामे देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी आणि ग्रामीण भागातील कुपोषित बालकांच्या राहण्याचे ठिकाणाजवळ वन जमिनीत आणि इतर जमिनीत गवत काढण्याचे काम रोजगार हमीतून दिले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कुपोषित बालकांच्या कुटुंबियांना रोजगार मिळेल तसेच कुटुंबाकडे रोजगार असल्याने मुलांना पोषक आहार मिळून कुपोषणाच्या प्रमाणात घट होणार असल्याने कुपोषित बालकांच्या कुटुंबास रोजगार देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (३०-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मागेल त्याला काम या तत्वानुसार कामे उपलब्ध करुन देण्यात येतात व त्यानुसार कामाची मागणी केलेल्या सर्व कुटुंबाना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

सदर काम हे केंद्र शासनाच्या कार्यान्वयीन मार्गदर्शक सूचनांच्या पुस्तीकेतील प्रकरण ७ अंतर्गत मुद्दा क्र.७.३.२ नुसार गवत कापणीचे काम अनुज्ञेय कामांमध्ये समाविष्ट नाही.

(३) सर्व जॉबकार्ड धारक व्यक्तींना अनुज्ञेय कामावर मागणीप्रमाणे रोजगार देण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रामपंचायत अडगाव (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) येथील कुशल बांधकामाचे देयक प्रंलबित असल्याबाबत**

**(३४) १०८७४९ (०७-०४-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.रणजीत कांबळे (देवळी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामपंचायत अडगाव (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) येथील विहीरीचे कुशल बांधकामाचे देयक प्रलंबीत असल्याने दोषींवर कारवाई करुन देयके अदा करणेबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार दोषींवर कारवाई करुन संबंधीत लाभार्थ्यांचे बांधकामाचे प्रलंबीत देयके देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (३०-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) मौजे अडगाव बु. येथील खचलेल्या विहीरीची ८ देयके व नरेगा सिंचन विहिरीची २ देयके प्रलंबित होती. चौकशी अंती संदर्भीय १० पैकी ७ विहिरीचे कुशल बांधकामाची देयके प्रदान करण्यात आलेली आहेत. उर्वरीत ३ लाभार्थी अपात्र आढळून आल्यामुळे त्यांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्याचे गट विकास अधिकारी यांना आदेशीत करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिकेने आपल्या हद्दीतील बेकायदा बांधकामे ठराविक शुल्क आकारून नियमित केल्याबाबत**

**(३५) १०९०८३ (११-०४-२०१८). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेने शासनाने घेतलेल्या नियमानुसार आपल्या हद्दीतील दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ पूर्वी झालेली बेकायदा बांधकामे ठराविक शुल्क आकारून नियमित करण्याची प्रक्रिया सुरु केली असून दिनांक ३० जून, २०१८ पर्यंत यासंबंधीचे अर्ज मागविण्यात आलेले आहेत व या मुदतीनंतर एकही बांधकाम नियामानाकुल केले जाणार नाही असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन विभाग, किनारपट्टी नियमन क्षेत्र, ना विकास क्षेत्र तसेच बफर झोनमध्ये यापूर्वी उभी राहिलेली बेकायदा बांधकामे नियमित करता येणार नसल्याने ठाण्यातील जवळपास तीन हजाराहून अधिक बेकायदा इमारतींना नियमित होण्याचा मार्ग बंद झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे महानगरपालिकेच्या विकास नियंत्रित नियमावलीत मैदान, उद्यान तसेच मोकळ्या जागांवर उभी राहिलेली बेकायदा बांधकामे तेथील रहिवाश्यांचे इतरत्र स्थलांतर झाले नसेल किंवा आरक्षण बदलण्यात आले नसेल तर नियमित करता येणार नाही , हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रहिवास, वाणिज्य, औद्योगिक क्षेत्रामधील बांधकामे तेथील भूनिर्देशांक, मोकळ्या जागा, रस्त्यांची रुंदी तसेच पार्किंग, जिन्यांची रुंदी, पाणीपुरवठा, मलनिस्सारण, अग्निशमन विभागाचा ना हरकत दाखला यासंबंधित बाबींची पूर्तता केल्यास नियमित करण्यात येतील मात्र बहुतांश बेकायदा बांधकामांच्या ठिकाणी या बाबींकडे दुर्लक्ष करण्यात आले असल्याने ती बांधकामे बेकायदा राहण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५२ क नुसार अनधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावून "प्रशमित संरचना" म्हणुन घोषित करण्यासाठी अधिनियमाचे कलम १५८ (१) अन्वये नियम प्रसिध्द केले असल्याचे तसेच उपरोक्त अधिसूचनेमधील अ.क्र. ५ मध्ये अनधिकृत विकास हा क्षमापीत विकास म्हणून घोषीत करता येणार नाही, असे नमुद असल्याचे ठाणे महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

## राज्यातील शेती, घरगुती, उद्योगांच्या पाणीपट्टीमध्ये वाढ करण्याचा महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने घेतलेला निर्णय

**(३६) १०९२०५ (१३-०४-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.अजय चौधरी (शिवडी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेती, घरगुती, उद्योगांच्या पाणीपट्टीमध्ये महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने दिनांक १९ जानेवारी,२०१८ रोजी वाढ करण्याचा निर्णय घेतलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिनरल वॉटर, शीतपेय, बिअर उत्पादक उद्योगांसाठी पाण्याच्या दरात किती वाढ करण्यात आली आहे व शेती आणि पिण्याच्या पाण्यासाठी किती टक्के दरवाढ करण्यात आली आहे,

(३) असल्यास, पाण्यावरील दरवाढीमुळे राज्य शासनाला किती जादा महसूल मिळणार आहे व नवीन दरवाढीनुसार शेती,पिण्याचे पाणी व औद्योगिक वापरासाठी पाण्याचे दर किती होणार असून त्याची अंमलबजावणी कधीपासून करण्यात येणार आहे,

(४) तसेच राज्याच्या विविध भागामध्ये नेहमीच जाणवणारी पाणीटंचाईची समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०६-२०१८) :** (१) होय.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे आदेश क्र. १/२०१८ दिनांक ११ जानेवारी, २०१८ अन्वये पाण्याची दरवाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(२) मिनरल वॉटर, शीतपेय, बिअर उत्पादक कच्चामाल उद्योगांसाठी पाण्याच्या दरात सर्वसाधारण ६५% व औद्यागिक प्रक्रीया उद्योगासाठी ५०%, शेतीसाठी ३५ ते ५०% व पिण्याच्या पाण्यासाठी (ग्रा.पं. - १३.६३ %, नगरपालिका - १३.९२%, म. न.पा.- १९%) दरवाढ करण्यात आली आहे.

(३) म.ज.नि.प्रा.आदेश क्र.१/२०१८,दि.११.१.२०१८ मध्ये पाण्याच्या दरात वाढलेल्या टक्केवारी नुसार पाण्यावरील दरवाढीमुळे शासनास ज्यादा महसुल मिळणार आहे.

म.ज.नि.प्रा.आदेश क्र.१/२०१८,दि.११.१.२०१८ मध्ये नवीन दर निश्चीत करण्यात आले असुन पाणीपट्टीचे दर औद्यागिक वापराकरीता दि.१ फेब्रुवारी, २०१८ पासून व सिंचनाकरीता १ एप्रिल, २०१८ (उन्हाळी हंगाम २०१८) पासून लागु करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रकल्पाचे जलाशयातील उपलब्ध पाणीसाठा विचारात घेवुन व जिल्ह्यातील पाणीटंचाईचा विचार करून जिल्हास्तरीय समितीमध्ये प्रकल्पनिहाय आरक्षण करण्यात येते. त्यानंतर उर्वरित पाणीसाठ्यावर शासनाचे धोरणानुसार सिंचनाचे नियोजन करण्यात येते. पाणीटंचाईची समस्या सोडविण्यास शासनाच्या इतर विभागांशी समन्वय साधुन समयोचित कार्यवाही करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उपअभियंता द्वार उभारणी उपविभाग क्र. ३ क सांगली यांचे मुख्यालय सांगली येथेच ठेवण्याबाबत**

**(३७) १०९३२४ (१२-०४-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपअभियंता द्वार उभारणी उपविभाग क्र. ३ क सांगली यांचे मुख्यालय सांगली येथेच ठेवण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ जानेवारी,२०१८ रोजी मा. जलसंपदा मंत्री यांच्याकडे पत्रव्यवहार करून मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३ )नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१८) :** (१) होय.

(२) मुख्य द्वार उभारणी विभागीय पथक क्र.३,पुणे या कार्यालयाच्या कार्यक्षेत्राच्या दृष्टीने पुणे येथील कार्यालयाचे मुख्यालय वारणा वसाहत, पेठ नाका, जिल्हा सांगली या मध्यवर्ती ठिकाणी स्थलांतरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन जिल्हा शाखा नाशिक यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत**

**(३८) १०९४२५ (२८-०३-२०१८). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन जिल्हा शाखा नाशिक यांनी मा.ग्रामविकास मंत्री यांना संघटनेच्या प्रलंबित मागण्यांबाबतचे लेखी निवेदन दिनांक १६ जानेवारी,२०१८ रोजी वा त्यासुमारास दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन जिल्हा शाखा नाशिक यांनी दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी पासून असहकार आंदोलन सुरु केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार ग्रामसेवकांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-०७-२०१८) :** (१) होय,

(२) होय,

(३) महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन जिल्हा शाखा नाशिक यांच्या प्रलंबित मागण्यासंदर्भात वेळोवेळी संघटनेबाबत बैठका घेण्यात आल्या असुन अनेक वर्षापासून प्रलंबित प्रशासकीय कामकाजाबाबतचे त्यांचे प्रलंबित प्रश्न आंदोलनातील निवेदनात नमुद केल्याप्रमाणे मुद्दानिहाय निपटारा करणेकामी कार्यवाही केली असून उर्वरित मागण्याही त्वरीत पूर्ण करण्याबाबत

कार्यवाही सुरू आहे. नियुक्ती प्राधिका-याच्या अधिकारातील कामकाजाबाबत नाराजीचे मुद्दे व इतर बाबी आंदोलनातील निवेदनात असून सद्यस्थितीत ग्रामसेवक युनियनची कोणतीही तक्रार राहिली नाही.

(४) अशी बाब नाही.

---

**पुणे जिल्हा परिषदेच्या अखर्चित निधीबाबत**

**(३९) ११०४५६ (२८-०३-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इतर जिल्हा परिषदेच्या तुलनेत मोठा अर्थसंकल्प करणा-या पुणे जिल्हा परिषदेने मागील ६ वर्षात मंजूर अर्थसंकल्पापैकी फक्त ६५ ते ६७ टक्के खर्च केला असल्याचे दिनांक १५ जानेवारी,२०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित ३० ते ३५ टक्के निधी वेळेत खर्च न केल्यामुळे विकासकामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार दरवर्षी निधी अखर्चित ठेवणा-या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१८) :** (१) होय अंशत: खरे आहे.

पुणे जिल्हा परिषद पुणे यांचे मागील ६ वर्षात म्हणजे सन २०११-१२ ते सन २०१६-१७ चा अर्थसंकल्प शासनाकडून प्राप्त अनुदानाच्या उत्पन्नातून तयार करणेत आलेला आहे.
त्यानुसार जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पाचा खर्च सन २०११-१२ चा खर्च ६२.४५%,सन २०१२-१३ चा खर्च ६४.२९%,सन २०१३-१४ चा खर्च ६५.३०%,सन २०१४-१५ चा ८६.१५%,सन २०१५-१६ चा खर्च ६७.२१% व सन २०१६-१७चा खर्च ७७.७६% झालेला आहे.साधारणपणे मागील चार वर्षाचा खर्च हा ६५ ते ६७% आहे व दोन वर्षाचा खर्च ७०%पेक्षा जास्त झालेला आहे.

(२) नाही.

जिल्हा परिषद स्व:निधीचे अर्थसंकल्पातील निधी खर्च करणेची मर्यादा त्या-त्या आर्थिक वर्षातील असून ३१ मार्च पर्यंत चालू व पूर्ण झालेल्या कामांचा खर्च त्या-त्या आर्थिक वर्षात होतो.उर्वरित अखर्चित राहीलेला निधी हा पुढील वर्षाच्या अर्थसंकल्प तयार करताना विचारात घेऊन अपुर्ण कामांसाठी पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पातून खर्च करण्यात येतो.त्यामुळे निधी खर्च न झाल्यामुळे विकास कामे प्रलंबित रहात नाहीत.

(३) नाही.

जिल्हा परिषद निधीचा प्रत्येक आर्थिक वर्षातील कमी जास्त जमा व खर्चाचा लेख्यास महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ६६(अ) नुसार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन सदर कमी व जास्त जमा व खर्चाबाबत दिलेली कारणे विचारात घेऊन मंजुरी घेणेत आलेली आहे.

अर्थसंकल्पानुसार उपलब्ध करुन दिलेला निधी विहीत मुदतीत खर्च करणेबाबत पदाधिकारी व अधिकारी यांचे संयुक्त बैठकांमध्ये वेळोवेळी आढावा घेणेत येतो.पुर्ण खर्च करणेबाबत खाते प्रमुखांना सूचना दिल्या जातात.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र -तेलंगणा राज्याच्या सीमेला जोडणा-या सांगवी (उमर ) येथील लेंडी नदीवरील पुलासाठी जमिनीचे भूसंपादन करुन पुलाचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(४०) ११०५६४ (०९-०४-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र-तेलंगणा राज्याच्या सीमेला जोडणा-या सांगवी (उमर) येथील लेंडी नदीवरील पुलाचे काम भूसंपादनामुळे वर्षभरापासून प्रलंबित झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त भूसंपादनामध्ये २ शेतक-यांच्या जमिनी गेल्या असून त्यांना अदयापी त्याचा मोबदला मिळाला नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार उक्त पुलासाठीच्या जमिनीचे भूसंपादन करून पुलाचे काम तातडीने पूर्ण करण्यासह भूसंपादनाचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) व (४) शेतकऱ्यांना भुसंपादनाचा मावेजा मिळावा याकरिता खाजगी वाटा घाटी द्वारे जमिनीचे संपादन करण्याकरिता उप अधिक्षक भुमिअभिलेख, देगलूर यांचेकडून दि. १६.०२.२०१७ रोजी मोजणी नकाशा व संयुक्त मोजणी विवरणपत्र देण्यात आले आहे. संयुक्त मोजणी विवरणपत्राप्रमाणे सुधारीत भुसंपादनाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी नांदेड यांचेकडे दि.२९.०६.२०१७ रोजी सादर करण्यात आला होता व त्याची त्रुटीची पुर्तता करून दि.२८.११.२०१७ रोजी फेर सादर केला आहे. भुसंपादनाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. सद्यःस्थितीत काम जवळपास पूर्ण झाले आहे फक्त पुलाचे Return Wall व जोडरस्ते तेलंगणा बाजुचे बाकी आहे. वाटाघाटीच्या निर्णयासाठी मा. जिल्हाधिकारी नांदेड यांनी दि. ११.०५.२०१८ रोजी आयोजित केलेल्या बैठकीमध्ये जिल्हास्तरीय समितीने संपादित होणा-या क्षेत्रासाठी जमीनीच्या आकारणीनुसार दर निश्चित केला असून निश्चित केलेल्या दराप्रमाणे संपादित होणा-या क्षेत्रास मावेज रक्कम देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पेठवडगांव ते लाटवडे (जि.कोल्हापूर) रस्त्यावरील साईमंदिराजवळील ओढयावरील पुलाची झालेली दुरवस्था

**(४१) ११०६८९ (०९-०४-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेठवडगांव ते लाटवडे (जि.कोल्हापूर) या रस्त्यावरील साई मंदिराजवळच्या ओढयावरील पुलाचा अर्धा भाग तीन महिन्यापूर्वी खचला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदरच्या पुलाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१८) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

पेठवडगाव ते लाटवडे (जि.कोल्हापूर) रस्त्यावरील साईमंदिराजवळील ओढ्यावर ९०० मि.मी.व्यासाची एका रांगेची १० मीटर लांबीच्या मोरीपैकी २ मी. लांबीचा भाग खचलेला होता.

(२) याबाबत कार्यकारी अभियंता, कोल्हापूर यांनी पाहणी केली आहे.

(३) सदर मोरीची व रस्त्याची दुरूस्ती करून रस्ता पुर्ववत केला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य यांना निवडून आलेल्या क्षेत्राचा विकास करण्याकरिता निधी मिळण्याबाबत

**(४२) १११५७९ (०६-०४-२०१८). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडून देण्यात येणारा १४ व्या वित्त आयोगाचा लाभ हा थेट ग्रामपंचायतींना होणार असल्याने त्या भागातून निवडून आलेल्या भागातील पंचायत समिती सदस्य व जिल्हा परिषद सदस्य या विकास कामे करताना स्व निधी व्यतिरिक्त इतर कोणत्याही निधीचा पर्याय उपलब्ध नसल्याने विकास कामे करण्यास गैरसोयीचे होत असल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,१४ व्या वित्त आयोगानूसार थेट ग्रामपंचायतींना निधी देऊन ग्रामीण भागाचा विकास जलदगतीने करण्याच्या धोरणाची अंमलबजावणीदेखील तेवढीच अतिशय महत्वाची बाब असल्याने १४ व्या वित्त आयोगानूसार राखीव ठेवलेल्या १० टक्के निधीमधून ग्रामपंचायतींना तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य यांना विकास कामे करण्यासाठी वेगळा निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०७-२०१८) :** (१) नाही

(२) होय

(३) १४ व्या वित्त आयोगांतर्गत केंद्र शासनाकडून ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांकरीता राज्याला प्राप्त होणारा निधी हा अबांधिल स्वरुपाचा असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्राप्त होणारे संपूर्ण अनुदान ग्राम विकास विभागाकडून ग्रामपंचायतींना वितरीत करण्यात येते. शासन स्तरावर चौदाव्या वित्त आयोगाचा कोणताही निधी राखून ठेवता येत नाही. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रस्तुत वितरीत निधीचा विनियोग ग्रामपंचायतींनी पायाभूत सेवांवर करावयाचा असून त्यातून करावयाच्या खर्चाचे व नियोजनाचे अधिकार संबधित ग्रामपंचायतीला व ग्रामसभेला आहेत. त्यामुळे १४ वा वित्त आयोगाच्या निधीमधून जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य यांना विकास कामे करण्यासाठी वेगळा निधी देता येणार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दोंडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील शिरवल मार्ग निडलवाडी केर ते भेकुर्ली या रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(४३) ११२४९७ (०९-०४-२०१८). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दोंडामार्ग तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) शिरवल मार्ग निडलवाडी केर ते भेकुर्ली या १६ किमी रस्त्यासाठी पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून कोटयावधीचा निधी खर्च करून तयार करण्यात आलेल्या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून रस्ता न करताच काही वर्षापूर्वी पावरग्रीड कंपनीने विद्युत लाइन ओढण्यासाठी केलेल्या रस्त्यावर खडी पसरवून रस्ता केल्याचे दाखवून कोटयावधी रूपयांचा घोटाळा केल्यामुळे याप्रकरणी चौकशी व्हावी म्हणून तेथील ग्रामस्थांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग, जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग, कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग आदींकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणी मान्य न झाल्याने ग्रामस्थांनी २६ जानेवारी २०१८ रोजी वा त्या सुमारास दोंडामार्ग तहसिलदार कार्यालयासमोर उपोषण करुन यापुढेही आंदोलन करण्याचा इशारा दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करुन गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१८) :** (१) ग्रामस्थांनी निवेदन दिले आहे, हे खरे आहे. तथापि, सदर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून, रस्ता न करताच काही वर्षापूर्वी पावरग्रीड कंपनीने विद्युत लाईन ओढण्यासाठी केलेल्या रस्त्यावर खडी पसरवून रस्ता केला असल्याचे दाखवल्याची बाब खरी नाही.पावरग्रीड कॉर्पोरेशच्या जागेत यापूर्वी फक्त जंगल होते, जुना रस्ता अस्तित्वात नव्हता.

सदर रस्त्याचे काम मार्च, २०१६ मध्ये पूर्ण झाले असून रस्ता सुस्थितीत आहे.सदर रस्त्याच्या कामाची तपासणी वेळोवेळी राष्ट्रीय गुणवत्ता निरिक्षक (NQM) व राज्य गुणवत्ता निरिक्षक (SQM) यांच्याकडून झाली असून, त्यांचे शेरे समाधानकारक आहेत.

(२) ग्रामस्थांची मुख्य मागणी ही सदर रस्त्यावरून एसटी वाहतूक नियमित सुरू करण्याची आहे.

(३) राष्ट्रीय गुणवत्ता निरिक्षक (NQM) व राज्य गुणवत्ता निरिक्षक (SQM) यांच्याकडून सदर कामाची तपासणी झाली असून, त्यांचे शेरे समाधानकारक आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाटी-कोंडशी गोळेगाव या रस्त्याचे काम अपूर्ण असल्याबाबत**

**(४४) ११२५१४ (०९-०४-२०१८). श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान ग्रामसडक योजने अंतर्गत मंजूर झालेला आसोला पाटी-कोंडशी गोळेगाव या रस्त्याचे काम दिड वर्षामध्ये पूर्ण करण्याचे नियोजन होते परंतु तीन वर्ष पूर्ण झाली तरीही या रस्त्याचे काम अपूर्ण असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच या रस्त्याच्या कामामध्ये गिट्टी व मुरुम कमी प्रमाणात वापरल्यामुळे त्या रस्त्याची दुरवस्था झाली असून अपघाताचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याची पाहणी केली आहे काय व त्यानुसार रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही,

सदरील काम प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत दि.२९.०४.२०१७ रोजी पुर्ण करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही,

प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत शासन निकषान्वये राज्य गुणवत्ता समन्वयकामार्फत राष्ट्रीय व राज्य गुणवत्ता निरिक्षक (NQM&SQM) यांचे मार्फत वेळोवेळी कामाच्या तपासण्या झाल्याअसून सदर कामाबाबत सर्व निरिक्षकांचा समाधानकारक अहवाल / शेरा आहे.

(३) सदरील रस्त्याची तपासणी वेळोवळी राष्ट्रीय व राज्य गुणवत्ता निरिक्षक (NQM&SQM) यांचेकडून करण्यात आलेली आहे. सदरील काम दि.२९.०४.२०१७ रोजी पूर्ण करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बाभुळगांव (जि.यवतमाळ) तालुकयातील दिघी क्रं १ येथील पाणी पुरवठयाचे काम अपुर्ण व निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**

**(४५) ११२५७१ (२८-०३-२०१८). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाभुळगांव (जि.यवतमाळ) तालुकयातील दिघी क्रं १ येथील पाणीपुरवठा योजनेचे काम करण्यात आले परंतु तेथील नागरीकांनी दिलेल्या निवेदनावरून दिनांक ७ जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यासुमारास निकृष्ट दर्जाचे काम करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, पाणी पुरवठा योजनेमध्ये सिमेंट टाकीचे बांधकाम, पाईपलाईन टाकणे अशी कामे घेण्यात आली सिमेंट टाकीचे बांधकाम केले परंतु जागोजागी भेगा पडल्याने आणि निकृष्ट दर्जाचे पाईप वापरल्याचे नागरीकांनी दिलेल्या निवेदनावरून निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून कंत्राटदार व संबंधित विभागाचे अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१९-०६-२०१८) :** (१) नाही.
सदर काम हे सन २००७ मध्ये पुर्ण करण्यात आले असुन सदर गावठाण २०१० मध्ये पंचायत समिती बाभुळगांव यांना हस्तांतरित केले आहे.
(२) सदर कामास ८ वर्ष पूर्ण झाली असल्यामुळे किरकोळ दुरुस्तीची कामे करण्याची गरज असुन पुनर्वसनाचे आधुनिकीकरणांतर्गत प्रस्तावित आहे.
(३) सदर काम पुर्ण होऊन दोष निवारण कालावधी संपलेला असल्याने चौकशी करण्याची आवश्यकता नाही. सद्य:स्थितीत काही किरकोळ दुरुस्त्या करणे आवश्यक असुन आधुनिकीकरणाअंतर्गत सन २०१८-२०१९ मध्ये दुरुस्तीची कामे डिसेंबर २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बाभुळगांव (जि.यवतमाळ) तालुक्यातील बेबंळा कालव्याच्या उजव्या बाजुला महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीव्दारे विद्युत पुरवठा करण्याबाबत**

**(४६) ११२६३२ (२८-०३-२०१८). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **लाभक्षेत्र विकास विभाग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाभुळगांव (जि.यवतमाळ) तालुक्यातील बेबंळा प्रकल्पामधुन कालव्याव्दारे बाभुळगांव , कळंब , राळेगांव तालुक्यात पाणी सोडल्या जाते परंतु कालव्याच्या उजव्या बाजुने उपकालव्याची पाटस-याची निर्मीती केली नसल्याने जवळ पाणी दिसत असतांना शेतक-यांना सिंचनाकरीता पाणी घेता येत नसल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याभागातील शेतक-यांनी दिलेल्या निवेदनावरून सिंचनाकरीता पाणी घेण्यासाठी विद्युत वितरण कपंनी कडुन कालव्याच्या उजव्या बाजुने काठावरून विद्युत पुरवठा करण्यात आल्यास शेतक-यांना सिंचनाकरीता पाणी मोटरपंपाव्दारे घेता येईल,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतक-यांना सिंचनाचा लाभ मिळावा याकरीता विद्युत वितरण कंपनीकडुन उजव्याबाजुला लाईन टाकण्याचे काम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१९-०६-२०१८) :**

(१) बेंबळा कालव्याचे उजव्या बाजूस लाभक्षेत्र उपलब्ध नसल्याने उजव्या बाजूस वितरण प्रणाली प्रस्तावित नाही. तसेच कालव्याच्या उजव्या बाजूकडील क्षेत्र कालवा पातळीच्या वर असल्याने प्रवाही सिंचन करता येत नाही.

(२) होय.

(३) बेंबळा कालव्याचे उजव्या बाजुकडील क्षेत्र लाभक्षेत्रात येत नसल्याने प्रकल्पाच्या लाभक्षेत्राच्या १० टक्के प्रमाणात गावनिहाय क्षेत्रास मुख्य कालव्यावरुन इलेक्ट्रिक मोटरपंप किंवा डिझेल पंपाने पाणी उपसा परवाने देण्याची नियमात तरतुद आहे. त्याअनुषंगाने संबंधित शेतक-यांनी बेंबळा प्रकल्प विभागाकडे रीतसर अर्ज करुन उपसा पाणी परवाना प्राप्त करणे अनिवार्य आहे. परवाना मिळाल्यानंतर संबंधीत शेतकऱ्याला वैयक्तिकरित्या विदयुत वितरण कंपनीकडे विदयुत कनेक्शन मिळण्यासाठी अर्ज करता येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हा नियोजन समितीच्या निधीमध्ये ३१ कोटी २२ लाख ७८ हजाराचा निधी कमी करण्यात आल्याबाबत**

**(४७) ११३६१९ (०४-०४-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हा नियोजन समितीच्या निधीमध्ये सन २०१७-१८ करिता ३१ कोटी २२ लाख ७८ हजाराचा निधी कमी करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निधीमधून २५ कोटी १२ लाख ३३ हजार इतका निधी खर्ची न पडल्याने काही विभागांकडून निधी काढून घेण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०६-२०१८) :** (१) वित्त विभागाच्या दि. ३०/०६/२०१७ च्या परिपत्रकान्वये सन २०१७-१८ करीता जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत
निधी उपलब्ध करुन दिलेल्या पैकी महसूली लेख्यातील ७० टक्के व भांडवली लेख्यातील ८० टक्के इतक्यामर्यादेत निधी खर्च करण्याच्या सूचनांनुसार जिल्हा नियोजन समिती, रत्नागिरी यांनी एकूण रु. ३१.६५ कोटी इतका निधी प्रत्यार्पित करण्याचे जानेवारी २०१८ मध्ये नियोजन केले होते. तथापि, वित्त विभागाच्या दि. ०६/०२/२०१८ च्या शासन परिपत्रकान्वये महसूली व भांडवली लेख्यातील संपूर्ण (१०० टक्के) निधी खर्च करण्याची परवानगी देण्यात आली.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ग्रामीण रस्ते विकासाच्या कामाशी संबंधित असलेल्या कंत्राटी कामगारांच्या विविध मागण्यांबाबत**

**(४८) ११५८९३ (०९-०४-२०१८). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हयातील प्रधानमंत्री व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत गेल्या अनेक वर्षापासून काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांना सन २०१२ पासून अद्यापपर्यंत पगारवाढ न झाल्याने तसेच त्यांच्या अन्य महत्वाच्या मागण्या संबंधित अधिकारी व शासनाकडे निवेदनाद्वारे कळवुनही कोणतीही कार्यवाही झाली नसल्याने दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ रोजी पासून कामबंद आंदोलन सुरु केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कामगारांनी काम बंद आंदोलन सुरु केल्यामुळे जिल्हयातील ग्रामीण भागातील विविध योजनेंतर्गत सुरु असणारी कामे बंद आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कंत्राटी कामगारांच्या मागण्या काय आहेत व त्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१८) :** (१) होय हे खरे आहे,

कंत्राटी कर्मचाऱ्यांनी दि.१५ फेब्रुवारी, २०१८ पासून काम बंद आंदोलन केले होते. तथापि, सद्यस्थितीत सदर आंदोलन मागे घेण्यात आले असून सर्व कंत्राटी कर्मचारी कामावर रूजू झाले आहेत.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) कंत्राटी कामागारांची वेतनवाढ, प्रवासभत्ता, वैद्यकीय रजा, प्रसुती रजा, अपघात विमा इत्यादी मागण्या आहेत. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला असून, इतर मागण्यांबाबत शासनाच्या प्रचलित नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईसह राज्यातील सर्व ठिकाणी पिण्याच्या पाण्याच्या दरात वाढ झाल्याबाबत**

**(४९) ११६१९३ (२८-०३-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **लाभक्षेत्र विकास विभाग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील सर्व ठिकाणी पिण्याच्या पाण्याच्या दरात १९ टक्क्यापर्यंत वाढ झाली असून औद्योगिक वापरासाठी लागणारे पाण्याचे दर ५० टक्क्यापर्यंत महागले आहेत असे दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही वाढ माहे जून २०११ नंतर ७ वर्षाने करण्यात आली असून राज्यातील पाणी दर वाढीचा परिणाम सर्व ग्रामपंचायती, नगरपालिका आणि महानगरपालिका क्षेत्रात राहणाऱ्या लोकांवर होणार असल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात पेट्रोल आणि डिझेलच्या दरातील वाढ तसेच वाढती महागाई यामुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाला असून त्यातच पाण्याच्या दरात वाढ झाली असल्यामुळे मुंबईसह राज्यातील सर्वसामान्य नागरिकांमध्ये असंतोष पसरला आहे. हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास याबाबत शासन पुनर्विचार करणार आहे काय नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०६-२०१८) :** (१) होय.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने आदेश क्र. १/२०१८, दिनांक ११/०१/२०१८ अन्वये महाराष्ट्र राज्यातील घरगुती औद्योगिक व कृषी सिंचन प्रयोजनार्थ वापरल्या जाणाऱ्या पाण्यासाठी ठोक जलदरात पुनर्विलोकन व सुधारणा केली आहे.पिण्याच्या पाण्याच्या दरात १३.६३ ते २३.८१ टक्के वाढ असुन प्रक्रिया केलेल्या मालाचे औद्योगीक पाणी वापरासाठी ५०% वाढ आहे.

(२) होय.

पाणी दरवाढ जून २०११ नंतर ७ वर्षाने करण्यात आली आहे.व ती राज्यातील सर्व भागासाठी लागू आहे.

(३) नाही.

महाराष्ट्रातील घरगुती, औद्योगीक व कृषी सिंचन प्रयोजनार्थ वापरल्या जाणाऱ्या पाण्याचे दर यापुर्वी २०१०- ११ पासून लागू करण्यात आले होते. सदर दर आजतागायत लागू होते. यामध्ये ७ वर्षांनी दरवाढ करण्यात आली असून सदर दर २०१८ ते २०२० या कालावधीसाठी लागू आहेत.व ते वाजवी आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील मुरुड-जंजिरा येथील खोरा बंदराची झालेली दुरवस्था**

**(५०) ११६४४६ (०४-०४-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रायगड जिल्ह्यातील मुरुड-जंजिरा येथील खोरा बंदर हे ब्रिटीशकालीन बंदर असल्यामुळे येथे मोठ्या प्रमाणात पर्यटक येतात व खोरा बंदरातून जंजिरा किल्ल्याला भेट देण्यासाठी हजारो पर्यटक दररोज मशीन बोटीचा उपयोग करतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नव्याने उभारलेल्या जेट्टीची नियमबाह्य पद्धतीने उंची वाढविली असून जेट्टीचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने ओहटीच्या वेळी बंदरात येणाऱ्या बोटीतून चढताना अथवा उतरताना अनेक पर्यटकांचा अपघात होऊन त्यांच्या पायाला व डोक्याला दुखापती झाल्या असल्याचे दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,

(३) असल्यास ,सदर जेट्टीची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार जेट्टीचे काम निकृष्ट दर्जाचे व नियमबाह्य करणाऱ्यांवर कारवाई करण्यासह जेट्टीची उंची योग्य प्रकारे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२९-०६-२०१८) :** (१) होय.

(२) सदर जेट्टीवर पर्यटकांना अपघात झाल्याबाबत महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाला कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) खोरा बंदर येथील जेट्टी येथे खड्डे पडल्याने जेट्टी नादुरुस्त झाली होती. त्यानुसार जेट्टीला वेअरिंग कोटचे काम केलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

| | |
|---|---|
| **विधान भवन :** | **डॉ. अनंत कळसे** |
| **नागपूर.** | **प्रधान सचिव,** |
| | **महाराष्ट्र विधानसभा.** |

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.